मराठी ग्रंथ संग्रहालय,
ग्रंथ नं. ......
ता. ......
ठाणे.

# दुःखाश्रुमाला.

वा. क्र. १६८८

# दुःखाश्रुमाला.

ही कविता

आपली पत्नी कै.वा. सौ० काशीबाई पाध्ये

हिच्या सादर स्मरणार्थ

दा. ग. पाध्ये, एम. ए.

( सेक्रेटरी, मुंबई स्कूल्स कमिटी )

यांनीं रचिली.

ती

इष्टमित्रांत खासगी रीतीनें वांटण्यासाठीं

अनंत आत्माराम मोरमकर

यांनीं

" श्री लक्ष्मीनारायण " छापखान्यांत छापून प्रसिद्ध केली.

मुंबई.

सेप्टेंबर १९१९.

REFBK-0001689

REFBK-0001689

# प्रस्तावना.

प्रस्तुत कवितेसारख्या कृतीला प्रस्तावनेची विशेषशी अवश्यकता नाहीं. ती रचण्यास कारणीभूत झालेला दैवाचा प्रकोप घडून येऊन दोन वर्षें झालीं. माझी पत्नी पायाच्या एका असाध्य दुखण्यानें सहा सात महिने आजारी राहून, केलेले सर्व उपाय निरर्थ होऊन, ता. २५ जुलई १९१७ रोजीं, आम्हां सर्वांस दुःखांत लोटून, इहलोक सोडून गेली. तिच्या आजारांत बळानें दाबून ठेवलेल्या विचारांनीं तिच्या मृत्यूनंतर अनावर उसळ घेतली आणि मनांत त्यांचें केवळ काहूर माजून गेलें. त्या विचारांनीं अभ्यासपरत्वें कवितांचें स्वरूप घेतलें, आणि कविता होत तसतशा मीं त्या टिपून ठेवल्या. त्यांची संख्या बरीच झाल्यावर, मनांत सहजगत्या कल्पना आली कीं, त्या सर्व कविता सुसंगत रीतीनें संकलित करून, त्यांस एका लहानशा विलापपर काव्याचें स्वरूप देऊन, ज्या सच्छील धर्मपत्नीच्या उल्लासमय समागमानें या जगांतील जीवयात्रा पस्तीस वर्षांचे कालावधींत प्रायः सुखमयी आणि सदैव उन्नत ध्येयाची अशी झाली, तिचें अल्पसें स्मारक म्हणून तें काव्य प्रसिद्ध करावें. तिजविषयीं आदर असलेल्या निकटवर्ती मित्रांस हा विचार पसंत पडून त्याचें दृश्य फल ही लहानशी कविता होय.

ह्या कवितेच्या विषयाशीं स्वतःचा इतका निकट संबंध आहे कीं त्यामुळें तिच्यांत भिन्न भिन्न प्रमाद राहण्याचा संभव आहे, हें मी जाणून आहें. जीं कांहीं न्यूनव्यंगें असतील त्यांबद्दल, प्रसंग आणि विषय लक्षांत घेऊन, रसज्ञ वाचक उदारमनानें क्षमा करतील अशी आशा आहे. त्यांस इतकेंच सांगणें आहे कीं, स्वतःच्या दुःखाविषयीं किंवा स्वपत्नीविषयीं अपूर्व अद्वितीयत्व व्यंजित करावें या हेतूनें ही कविता रचिलीं नाहीं. उलट, आर्यस्त्रियांचे पुराणविश्रुत गुण अद्यापिही जागृत व समूर्त आहेत, व आमच्या मातृभूमीच्या

पुनरुत्कर्षाविषयींची भिस्त देशावर आलेल्या सामान्य अवनतीनें न घेरलेल्या आमच्या स्त्रियांवरच मुख्यत्वें आहे, असेंच माझें मत आहे. असो. अपूर्व गुणांची आर्यवधू सुभाग्यानें लाधून ती हातची अकाळीं जाण्याचे प्रसंग मजसारखे दुसऱ्यांवर येतात, आणि त्यांस असह्य दुःख होतें, हेंही मी जाणून आहें. अशा हतभागी विधुरांस ह्या कवितेंतील कांहीं विचार आपलेच होत असें वाटून सहानुभूतिपूर्वक कांहीं समाधान वाटेल, अशी भावनाही हें काव्य प्रसिद्ध करण्यास अंशतः प्रोत्साहक झाली, असें सांगण्यास हरकत नाहीं.

ह्या कवितेचें जें शेवटचें स्वरूप पुढील पृष्ठांत नमूद केलें आहे, त्याजविषयींच्या श्रेयापैकीं पुष्कळसा भाग माझा नाहीं. ती वाचून, त्यांत नानातऱ्हेच्या सूचना करून, टीका करून, नवी भर घालून किंवा घालवून, तिला होईल तितकी सुसंगतता आणण्याचे कामीं ज्यांनीं मला साह्य केलें, त्यांचा मी अत्यंत ऋणी आहें. त्यांत पहिली पदवी माझे आतेबंधु व गुरु रा. ब. विष्णु मोरेश्वर महाजनि यांची होय. त्यांच्याविणें ह्या कवितेचें स्वरूप निराळेंच असतें. त्यांचेशिवाय मला मोठ्या तत्परतेनें व रसिकतेनें साह्य दिलें तें, रा. एकनाथ पांडुरंग रेंदाळकर, रा. सदाशिव नारायण ठोसर, रा. सा. रामकृष्णपंत मोरमकर, आणि रा. बळवंत रामकृष्ण मणेरीकर यांनीं. ह्या प्रिय मित्रांचाही मी फार आभारी आहें.

मुंबई.<br>ता. १३ आगस्ट १९१९ } दा. ग. पाध्ये.

---

# विषयोपक्रम.


| | |
|---|---|
| १—श्लोक १ ते २० | दुःखाची व्यापकता. |
| २—,, २१ ,, ३४ | इहलोकींचे प्रेमनिबंध तोडून गेलीस कशी ? |
| ३—,, ३५ ,, ५८ | दुःख व शोक यांचें कार्य व स्मरणमाहात्म्य |
| ४—,, ५९ ,, ६६ | तिचे गुण. |
| ५—,, ६७ ,, ७८ | ईश्वरापाशीं एक फिर्याद. |
| ६—,, ७९ ,, ९२ | संशयनिरसन व समाधान. |
| ७— दिंडी ९३ ,, ११० | कवि जयदेव व पद्मावती यांची कथा व तत्सदृश दिव्याची इच्छा. |

मराठी ग्रंथ संग्रहालय.
नं.
ता.
ठाणे.



सौ. काशीबाई पाध्ये.

जन्म १८७०

मृत्यू १९१७

B. A. P. W.

# दुःखाश्रुमाला.

दा. क्रं. १६८८

[ १ ]

गेली अंतीं जिवलग सखी टाकुनी या जनाला
दैवाघातां, अकरुण[1] जगीं, साहण्या एकट्याला;
दुःखाला हा कळस चढला; अंतरीं पेटलेली
चिंताज्वाला हृदय करुनी दग्ध आतां निमाली ॥ १ ॥

येतां अंत, क्षण,[2] मति महा मोहिं वेधूनि गेली,
आघाताची क्षण न अमिता[3] उग्रता ध्यानिं आली;
आली शुद्धि त्वरितच, कळे घातला घोर घाला
काळें लक्ष्मी हरिलि गृहिंची; शून्य केलें जगाला ॥ २ ॥

व्याधी हीची प्रभु हरिल—हा अंतरीं सांठवीला
आशाबंध प्रिय गणुनि तो भंगुनी चूर झाला;
आकाशाच्या मधुनि पडला तीव्रवेगें कुठार[4];
उन्मूळूनी सुखतरु पडे; विश्व झालें असार ॥ ३ ॥

संसारीं ये विरस-कटुता; जीविताची सतार
संमेलातें मुकलि, सगळे सूर झाले कठोर;
आनंदाचे दिवस सरले; मानसोत्साह गेला;
अंतश्चक्षूंवरि पटल ये; जीव-हेतू निमाला ॥ ४ ॥

---

१ निर्दय. २ मृत्यु झाला त्या वेळीं क्षणभर. ३ न मोजतां येणारी. ४ कुऱ्हाड.

नौका झाली महदुदधिच्या[1] मध्यभागीं अनेया[2];
नेलें दैवें हरुनि अदयें कर्णधारा[3] मदीया;
रात्रीं, मार्गीं विषम, करिंचा दीप रानीं विझाला;
आला माझा रणिं रिपुशरीं सारथी भूतलाला ॥ ५ ॥

प्रासादाचा[4] तुटुनि पडला धारणाच्या[5] पुजेचा
आधाराचा प्रमुखच शुभस्तंभ मध्यंतरींचा;
भावी काळाविषयीं रचिल्या योजना हेतुपूर्ण
झाल्या मोघा[6] क्षणिंच पवनव्यस्त[7]-मेघांसमान ॥ ६ ॥

दुःखा भार्याविरहजनिता नाहिं सीमा जगांत—
कर्णीं नित्य श्रवण करितों, वाचतों वाङ्मयांत;
वाल्मीकीनें रघुपतिचिया कालिदासें[8] अजाच्या
दुःखा केलें ग्रथित,—हृदया तें न वेधी कुणाच्या? ॥ ७ ॥

दुःखाची या परि अमितता कल्पनातीत[9] साची;
नाहीं आला अनुभव जया नाकळे त्या कदाची;
तेणें आत्मा अशरण पडे वेदनाकंटकांत
हें अंतस्थ क्षत गुरु, नसे ओषधी त्या जगांत ॥ ८ ॥

---

१ महासागराच्या. २ ताब्याचे बाहेर. ३ सुकाणू धरणारा मुख्य नावाडी. ४ राजवाड्याचा. ५ नव्या घरांच्या मधल्या खांबाची "धारण" पूजा करण्याचा प्रघात, विशेषतः कोकणांत, आहे. ६ विफल. ७ वाऱ्यानें उडवून लाविलेल्या मेघांप्रमाणें. ८ कालिदासकृत रघुवंशातील "अजविलाप" नांवाचा आठवा सर्ग शोकरसाविषयीं अत्यंत प्रसिद्ध आहे. शोक वर्णिला आहे तो राजा अज याचा, राज्ञी इंदुमती एकाएकीं वारली तिजविषयींचा. ९ कल्पनेचे पलीकडील.

सर्पाचेंही विष शमवुनी शोधितां[1] येइ रक्त;
यत्नें येई मधुरपणही सागराच्या जलांत;
जातां प्राणप्रिय परि सखी पेटला वन्हि पोटीं,
या लोकीं तो विझविल कुणी—सर्वथा आस खोटी ॥ ९ ॥

येतें चंद्रग्रहण निशिं ज्या पूर्ण खग्रासकारी,
अंधाराच्या प्रबल लहरी[2] व्यापिती सृष्टि सारी;
जातां माझी हृदयसुखदा ज्योति तैशी विझूनी,
शून्यत्वाच्या अविरल तमीं प्राण जाती बुडूनी ॥ १० ॥

दुःखां साऱ्या शमवि जगिं या काळ नेई लयाला,—
सर्वांशीं हें अवितथ[3] नसे वाटतें मन्मतीला;
दुःखां कांहीं अधिक वितरी उग्रता काळ घोर,
दावी [4]व्याप्ती कठिन-तमता केवि त्यांची अपार ॥ ११ ॥

[5]सुप्रेमाची गुणगणवती मूर्ति जी सौहृदाची,
सच्छिष्या जी, सचिव, गृहिणी, मित्र एकात्मतेची;
अर्धांगी ती हरण करितां काय नेई न दैव?:—
ऐसा राजा अज न करिता प्रश्न झाला वृथैव ॥ १२ ॥

एकामागें दिवस दुसरा येइ त्या त्या क्रमेंच,
दुःखें भार्यानिधनिं हृदया कष्टवीती नवींच;

---

१ शुद्ध करितां. २ लाटा. ३ खरें. काळानें दुःख कमी होतें हें म्हणणें सर्वांशीं खरें नाही; कारण कांहीं दुःखें काळ जातो तसतशीं अधिक उग्र व विस्तृत होतात, असा आशय. ४ विस्तार ५ ह्या श्लोकांतील बहुतेक भाग पूर्वोक्त "अजविलापां"तील खालील अतिसुंदर कवितेचें रूपांतर आहे:—

गृहिणी सचिवः सखी मिथः । प्रियशिष्या ललिते कलाविधौ ॥
करुणा-विमुखेन मृत्युना । हरता त्वां वद किं न मे हृतं? ॥

गेहीं, दारीं, रजनिदिवसां, मूर्ति सर्वप्रसंगीं
येते नेत्रीं; उपजवि महामूढता अंतरंगीं ॥ १३ ॥

× × ×

केली माळा अचिर[१] "गृहिणी[२]–"सद्गुणांच्या फुलांची,
उल्हासानें भगिनिंसि दिली भेट ती आदराची;
जीवंती, त्या कवनरचनीं स्फूर्ति देऊनि मातें,
त्या चित्राची सखि अजि दुणी सत्यता–साक्ष देते ॥ १४ ॥

नांदे लक्ष्मी, असतिं दुसरीं सर्व सौख्यें न वाण;
नाहीं भार्या, तरि भवन तें जीवशून्य श्मशानः—
सिद्धांता या विविध उपमारूपकीं व्यक्त केलें
आर्यस्त्रीचें विमलगुणता चित्र मीं रंगवीलें ॥ १५ ॥

त्याचा मातें अनुभव कटू अल्प काळेंच यावा
शोकावर्तीं[३] असुखकुहरीं[४] अंतरात्मा बुडावा,—
यावा येणेंपरिस जुळुनी योग खोट्या[५] नयाचा,
कां संकेत प्रभुवर तुझा जाहला या परीचा? ॥ १६ ॥

काव्यीं कांहीं स्खलित[६] अथवा न्यून अक्षम्य राही,
शिक्षा केली म्हणुनि मज कीं शारदादेविनें ही?
सांगे स्त्रीची विहित[७] पदवी उन्नत–ध्येय–भूत,
सत्यद्वेषी कालि म्हणुनि कीं दंडि मातें प्रमत्त? ॥ १७ ॥

---

१ नुक्तेंच. २ तीन वर्षांपूर्वी माझी "सुगृहिणी" नामक कविता विविधज्ञानविस्तारांत व इंदुप्रकाशांत प्रसिद्ध केली, तिला उद्देशून हा श्लोक रचला आहे. सदर काव्यांतील आशय श्लोक १५ मध्यें सांगितला आहे. ३ शोकाच्या भोवऱ्यांत (नदीतील). ४ असुखरूप खोल दरींत. ५ उलटचा न्यायाचा. ६ चूक. ७ योग्य.

किंवा आली कवनिं मजहीसारख्या मंदधीच्या
गोडी, मान्या रसिक विबुधां, स्फूर्तिनें पुण्य जीच्या,
स्वर्गी देवो अधिक मधुरा स्फूर्ति गाना उदात्ता,—
या उद्देशें **सुरपति** तिला आदरें होइ नेता? ॥ १८ ॥

होवो हेतू[1] सफल! मजला रोष त्याचा न लेश;
सत्काव्याचा त्रिभुवनिं पडो भूतिकारी[2] प्रकाश!
वाटे मातें, प्रियसखि परी स्वर्गिंही प्रेमपूर्णा
स्फूर्ती अत्युन्नत मजविणें नाहिं देणार कोणा! ॥ १९ ॥

स्वर्गी किंवा स्थळिं इतर ज्या अक्षयींच्या सुखाच्या
आहे वास प्रियसखि! तुझा योजनेनें **प्रभूच्या**,
तेथें मुक्ती मजसि मिळुनी भोग माझा सरेल
वाटे तावत् स्मरशिल मला, वाट तूं पाहशील! ॥ २० ॥

[ २ ]

पुण्या वृत्ती तुजसम सखे! सात्विका लोकिं ज्यांच्या
न प्रेमौवीं जनन-मरणें क्रांति होई तयांच्या;
जाणें, ओढा प्रियजनिं तुझा स्वर्गिं राहील तोच;
केलें त्वां जें गमन सहसा,-थोर आश्चर्य हेंच! ॥ २१ ॥

दुःखा अर्धें हरुनि पतिचें सौख्य दूणें कराया,
शल्यें चिंतादिक हृदयिंचीं गूढ ही उद्धराया,
नाहीं दूजा तुजसम सखा कोणि मातें जगांत;—
जातां, ऐशी न कशि तुझिया येइ शंका मनांत? ॥ २२ ॥

---

१ स्वर्गींच्या कवितेला माझी भार्या अधिक उन्नत स्फूर्ति देवो, हा उद्देश फलद्रूप होवो, त्याचा मला मत्सर नाहीं, असा आशय. २ कल्याणकारी.

संसाराचा मजकरिं तुवां मांडिला हा पसारा,
जातां त्याचा शिरिं मम सखे! टाकुनी भार सारा,
सांगे नीती, तुजसम हरी जो श्रमा, देइ धीर,
मंत्री नाहीं मज कुणि,—मनीं ये न कां हा विचार? ॥ २३ ॥

[१]संसाराची सम पदविनें आपली जी नयाची,
विश्वासाची जनिं बुधनुता पेढि चाले यशाची,
प्रत्यक्षा तूं पतचि तिचि जी, जाशि, तेणें दिवाळें
येतें:-कैसें तुजसि रुचतें, सांग हें शुद्धशीले! ॥ २४ ॥

पंचप्राणां मुदित करिता, वर्णनाऽतीत[२] साचा,
त्वत्सान्निध्यीं निधि[३] मज मिळे जो अनंता सुखाचा,
जो विश्रामीं[४] कृतिंतहि मला जीविताधार झाला,
नेशी त्यातें! पतिवरि कसा घालिशी घोर घाला? ॥ २५ ॥

आप्त स्नेही असति, मिळवा अन्य, विस्तीर्ण भू ही,—
ऐसें मातें वदशिल; तरी प्रश्न माझा तुलाही-
पुण्यें भावें गृहिं गृहिणिची काढि जागा भरूनी,
प्रेमस्यंदी[५] जन वद असा काय लाभेल कोणी? ॥ २६ ॥

मद्दुःखाचा क्षणभर असो दूर सारा विचार;
आशा माझ्या प्रबल मनिं कीं, तूं पुनः भेटणार;
संसारातें विटुनि पदिं तूं दूर लोटूनि देतां
जाया झाले प्रियजन किती—आणिलें तें न चित्ता! ॥ २७ ॥

---

१ येथें संसार ही एक पेढी व धर्मपत्नी म्हणजे त्या पेढीची मूर्तिमंत पत अशी कल्पना आहे. २ वर्णनाचे पलीकडे. ३ मूल्यवंत संचय. ४ विश्रांति घेतांना आणि काम करितांना, दोनीही वेळीं. ५ प्रेम पाझरणारा.

जीचा[1] भर्ता सुगुण धनवान् काळ नेई अकाळीं,
जामाताचें निधनहि जिच्या पाहणें ये कपाळीं,
जी दुःखांनीं इतरहि असे अंतरीं पोळलेली,
त्या आईची कणव[2] तुजला आड कैंवी न आली ? ॥ २८ ॥

सासू पूज्या, प्रियच परि जी मायशी मानिलीस,
जीच्या आज्ञा सतत शिरसावंद्य तूं पाळिल्यास,
एकापत्या[3] तुजसि दुहिता मानुनी जी रिझाली,
त्या मन्मातेवरिलहि तुझी कैंवि निष्ठा निमाली ? ॥ २९ ॥

ज्याच्यामध्यें तव सुविमला प्रेमला शांतवृत्ती
आहे सारी उतरलि, अशी धन्यता लोक देती,
पुत्र ज्येष्ठ, प्रणयि, तुझिया प्रीतिचा केंद्र त्याला
दे भेटाया अवधि[4] न, असा दूत कोठूनि आला ? ॥ ३० ॥

संसाराच्या तव सुत दुजा द्वारिंही जो न आला;
कन्या मुग्धा न उपवरता पूर्ण आली जियेला;
हीं दुर्दैवी उभय ! मुकती प्रेमला नेतृतेला[5] !
कर्तव्यें तद्गत विसरशी ! कोण हा मोह झाला ! ॥ ३१ ॥

---

१ ह्या श्लोकांत माझ्या पत्नीची माता श्री. सरस्वतीबाई खेर हिज-विषयीं उल्लेख आहे; २९ व्या श्लोकांत माझी माता श्री. व आतां कै. वा. झालेली, अन्नपूर्णाबाई, ३० व्या श्लोकांत माझा ज्येष्ट पुत्र चि. कृष्णराव डाक्टर जो मातेच्या मरणसमयीं अकोल्याहून येथें येऊं शकला नाहीं, ३१ व्या श्लोकांत कनिष्ठ पुत्र चि. गोविंदराव व कन्या चि. गंगूबाई, व ३२व्या श्लोकांत माझी ज्येष्ठ सून चि. सौ. लीलावती व तिचीं दोन मुलें, कुमारी कमला व चि. मधुकर, ज्यांचा माझ्या पत्नीला फार लळा असे, यांविषयीं उल्लेख आहे. २ कढ. ३ जिला एकच अपत्य होतें अशी ४ वेळ. ५ शिक्षण.

शुश्रूषीलें प्रणयसदृशें[1] भक्तिनें ज्या स्नुषेनें,
बाळा नात स्मरत **कमळा** नित्य जी आर्ततेनें,
तूतें घाली झडप बघतां जो **मधू** प्रेमराशी,
केलें यांचें कुतुक न पुरी हौस तों केविं जाशी ? ॥ ३२ ॥

सुप्रेमाच्या तव हृदयिंच्या आटवाया झऱ्यातें
स्निग्धत्वाच्या मृदुल–मधुरां तोडण्या बंधनातें
सांगे तूतें कवण ?—वदनीं शांतवृत्ती नितांता
झाली अंतीं परिणत,[2] तिचा कोण झाला प्रणीता[3]? ॥ ३३ ॥

पुण्यात्म्यानें कुणि बुधवरें बोध कीं गूढ केला ?
वैऱ्यानें वा अवचित कुणी डाव हा साधियेला ?
किंवा कोणी तुज दुखवितां ये विरक्ती मनासी ?
जासी किंवा हितच अमुचें गूढ साधावयासी ? ॥ ३४ ॥

[ ३ ]

ऐकोनी हे हसशिल, मला ठावकें, प्रश्न सारे;
हे मायेचे म्हणशिल मनोभ्रांतिकारी पसारे;
श्रेष्ठा लोकीं गमन करितां प्राप्त झालें असेल
ब्रह्मज्ञान प्रियसखि ! मला गूढ तें सांगशील ! ॥ ३५ ॥

वेदांताशीं परिचय मला नाहिं—ऐसें न साचें;
ठावें,–मृत्यु[4] प्रकृति, विकृती जीवित प्राणियांचें;

---

१ सासूच्या प्रेमाला अनुरूप अशा. २ परिपूर्ण. ३ प्रोत्साहक.
४ "अजविलापांत" वसिष्ठ महर्षि अजाचें समाधान करतांना म्हणतातः—
मरणं प्रकृतिः शरीरिणाम् । विकृतिर्जीवित मुच्यते बुधैः
( म्हणून ) अवगच्छति मूढचेतनः । प्रियनाशोहृदि शल्यमर्पितं
स्थिरधी स्तु तदेव मन्यते । कुशलद्वारतया समुद्धृतं
म्हणजे मृत्यु हा प्राण्यांचा सहज धर्म आणि जीवंतपणा हा अपकार होय. इ.

बंधोन्मुक्तां सुकर करितो मार्ग नित्या सुखाचा
मृत्यु प्राण्यां:—विदित मज हा वादही पंडितांचा. ॥ ३६ ॥

हीं सृष्टीच्या इतुकिंच जुनीं, जीर्ण, निःसत्व सारीं
तत्त्वें विद्वज्जनिं शिकविलीं भिन्न भिन्न प्रकारीं;
अश्रू नेत्रीं परि वद किती बोधिं या रोधियेले ?
अंतर्ज्वाला विझवुनि किती दुःखितां शांत केलें ? ॥ ३७ ॥

[1]दुःखातें यापरि मृदुलता कृत्रिमा आणण्यातें
जे यत्नांतें करिति, झटती दुःख उन्मूलण्यातें,
ठावे त्यांना नियम नसती सृष्टिनिर्बंधनाचे;
शक्याऽशक्यांतिल न कळती गूढ हेतु प्रभूचे ॥ ३८ ॥

ग्रीष्मीं तापा सहन करिते, होइ कष्टी धरा ही,
सौंदर्यातें त्यजि, करि तपा शीर्णपर्ण[2]द्रुमांहीं,
होते वर्षाऋतुंत विमला न्हाउनी अश्रुपूरीं,
तेव्हां येते रुचिर-सुभगा श्री तिला नेत्रहारी. ॥ ३९ ॥

अंतःशुद्धी, मजसि गमतें, त्यापरी प्राणियांची
साधायातें, धुवुनि कलुषा[3] पापवृत्ती मनींची,
दुःखा झाला प्रभु सुहृदयें निर्मिता या जगांत;
दुःखा ऐसें नच करि सुखा श्रेष्ठ कार्यीं नियुक्त ॥ ४० ॥

लोकीं एक क्षण भरंवसा नाहिं—हें जो कथील,
सद्वृत्तीचा सुगुण-महिमा मानसीं बिंबवील,
ऐश्वर्याचा सकलहि अहंकार खोटा हरून,
आत्मज्ञाना शिकविल गुरू कोण दुःखासमान ? ॥ ४१ ॥

---

१ तत्त्वज्ञानानें दुःख सौम्य किंवा समूळ नाहींसें करूं पाहणें हें ईश्वरी सूत्र भंगूं पाहणें आहे. तें शक्य नाहीं व इष्टही नाहीं, असा आशय.
२ ज्यांचीं पानें गळलीं आहेत अशा वृक्षांच्या साधनांनीं. ३ गढूळ.

पोळे, तापे, द्रुत[1] विरघळे, घेइ सोनें कढाला,
लोहाघाता सहन करितें, तेधवां ये कसाला;
यावी प्राण्यां तशिच जगिं या पात्रता सद्गतीची,
शिक्षा[2] नेमी प्रभु म्हणुनि ही दुःख कष्टादिकांची. ॥ ४२ ॥

मातें दुःख प्रियच म्हणुनी, अंतरीं सांठवीतां
लाभे शांति; त्यजिन नच त्या तूंहि आज्ञा करीतां;
राहो माझें चिर हृदयिंचें दुःख पूर्णस्वरूपी !
येवो[3] त्या न क्षय, न मृदुला धार होवो कदापी! ॥ ४३ ॥

[4]प्राणाधार, प्रियजन खरा, हृत्पटीं रेखिलेला,
ज्यांचा नेई अदयहृदयें मृत्यु घाळूनि घाला,
इच्छा त्यांना कधिं तरि मनीं होय कीं दूर जावा
तो प्रेमाचा विषय, हृदया पारखा पूर्ण व्हावा ? ॥४४॥

[5]कोणी पृच्छा जरि करि—वदा श्रेष्ठ सौख्यें मनींचीं,
विश्रामाचीं, सुरस रुचिचीं कोणचीं या जगींचीं—
द्यावें आद्यस्थल निजजन प्रीतिचा जो तयाला;
गेला स्वर्गीं प्रियकर, दुजें स्थान त्याच्या स्मृतीला. ॥४५॥

तूं जीवंती भुवनिं असतां संगती जी त्वदीया
झाली मातें सुख-शत-परा कामधेनूच धन्या,

---

१ सत्वर. २ शिस्त ( discipline ). ३ माझें दुःख कधींही कमी होऊं नये व त्याची ( दुःखरूपी सुरीची ) धारही बोथट होऊं नये, अशीच माझी इच्छा आहे. ४ मृत झालेल्या प्रियजनाची आठवण दुःख देते म्हणून ती नाहींशी व्हावी असें कोणी तरी इच्छील काय ? ५ जगांत सर्वांत श्रेष्ठ सुखें कोणतीं असा प्रश्न केला तर असें उत्तर देतां येईल कीं, आदि पदवीचें सुख म्हणजे जिवंत असलेला प्रिय जन, व त्याच्या खालोखालचें सुख म्हणजे मृत झालेल्या प्रियजनाची आठवण.

काळें नेतां, भुवनिं उरला कोण रात्रंदिनींचा
आतां दूजा स्मृतिविण तुझ्या जीविताधार साचा? ॥४६॥

इच्छा तेणें प्रबल मज कीं, ज्योति तूझ्या स्मृतीची
राहो जागी सतत सबला शर्मदा मानसींची;
तेणें लाभे विमल—सुखदा शांति माझ्या जिवाला,
ज्योत्स्ना[१] जैशी तम हरि नभीं, ताप नेई लयाला. ॥४७॥

ज्ञानी ब्रह्मीं अपरपरता—शून्य[२] होती निमग्न,
अर्पी भक्त प्रभुवर—पदीं आत्मसर्वस्व लीन,
किंवा रंगे कृपण मननीं जोडिलेल्या धनाचे—
श्रेष्ठ ध्येय स्मरणच तुझें तेंवि मज्जीविताचें! ॥ ४८ ॥

त्वन्नामाची तव पदविची श्रेष्ठता प्रेममूला
राहो राज्यीं मम गृहिंचिया अक्षता[३] पुण्यशीला!
होवो मंद स्मृति नच तुझी, हेतुनें या उपायां
योजूं जातां सुख, असुखिंही, होइ जीवा मदीया! ॥ ४९ ॥

धन्या मान्या प्रथमच वधू; मृत्यु नेतां तियेला,
टाकूं फासा बघति दुसरा मांडुनी डाव त्यांला,
येते भार्यास्मरणिं विधुरां शांतिदा जी मनींची
वृत्ती अभ्युन्नतसुखपरा, कल्पनाही न तीची! ॥ ५० ॥

जातां लोकीं परहि अझुनी शांतता--सुज्ञतेची
संसाराची शिकविसि सखे! रीति तूं साधुतेची;
त्वद्राज्याचा स्तुतिपर जनीं चालला कारभार;
लाभो आशीर्वचिं सुतसुतां त्वद्यशःश्रीहि थोर! ॥ ५१ ॥

१ चंद्रप्रभा. २ स्वकीय परकीय भावरहित. ३ संपूर्ण अशी.

भक्ती थोडी सगुणहि करूं हेतुनें या तयार
केल्या तूझ्या प्रतिकृति[१] गुणी पाहुनी चित्रकार;
याच्या दृष्टी निशिदिनिं अशा स्थानिं त्या ठेवियेल्या;
जागीं ज्योति स्मृतिचि तत्र त्या राखण्या साह्य झाल्या ! ॥५२॥

× × ×

ध्याऊं, गाऊं, स्तुति करुं किती मोहना[२] ! त्वत्कलेची ?
मृत्यूचेही वरि विजयिनी ही सुधा[३] या जगींची;
नोहे चित्र, प्रियसखिच तूं रोधुनी ठेविलीसी !—
शांता वृत्ती गुणरति तिची आननीं रेखिलीसी ! ॥ ५३ ॥

× × ×

अंतश्चक्षू रिझविसि सखे ! अंतरंगीं रहासी;
तूतें चित्रीं हृदय तरि हें इच्छितें पाहण्यासी;
चित्रां डोळे भरुनि बघतों एकटा एकचित्तें,
अश्रूंनीं तैं विझुनि मनिंचा दाह शीतत्व येतें ॥ ५४ ॥

चित्रालोकीं, समयिं, सखये ! पूर्व वृत्तांत सारा
होई जागा; पटिं लिखितसा येइ नेत्रांपुढारां;
एकात्मत्वा वरुनि उभयीं भोगिलीं संसृतीचीं[४]
सौख्यें, दुःखें, स्मरणिं गमतीं आज तीं सारखींची ! ॥ ५५ ॥

मूर्ती तूझी धरुनि हृदयीं, चित्र नेत्रीं पहातां,
त्वत्संगींचे अनुभव पुनर्जातसे चित्तिं येतां,
प्रत्यक्षाची[५] क्षणभर पडे विस्मृती मानसासी,—
पूर्वीं ऐशी असशि जगतीं, वाटतें, सौख्य देशी ! ॥ ५६ ॥

---

१ तसबिरी. २ माझ्या पत्नीची केवळ स्नेहार्थ तसबीर काढणारा चित्रकार रा. मोहनलाल नानालाल पंड्या. ३ अमृत. ४ संसाराचीं. ५ वस्तुस्थितीची, तूं गेली आहेस याची.

त्वन्मूर्ती ये हृदयिं, नयनीं, जी फिरूनी फिरूनी,
कां मानावी सकल मनिंची भ्रांति खोटी म्हणूनी ?
आत्मा तूझेसम शुचि, गुणी, प्रेमिं ओथंबलेला,
कां यावा न प्रियजनमनोरंजना या जगाला ? ॥ ५७ ॥

मृत्यूपश्चात् क्षण निज जनां बोध आनंद देण्या
पुण्यात्म्याला[1] जरिहि नसती शक्ति या लोकिं येण्या,
होती त्याची तरि अमरता शून्यकामा[2], निरर्थ;
साधायाचे जनहित तया रुद्ध होतील पंथ ॥ ५८ ॥

[ ४ ]

प्रत्यक्षत्वें असशिलच तूं भेटली, भेटशील,
सुप्रेमाच्या नयनिंहि मला सर्वदा पाहशील;—
नाहीं शंका; जरि न असतें हें खरें, मन्मनींची
प्रोत्फुल्ला ही खचित नसती माळ तूझ्या गुणांची ! ॥ ५९ ॥

पुष्पें कांहीं पवन हरुनी नेइ दूरी, तरीही
आमोदानें[3] दुमदुमविती दिक्प्रदेशां दहाही;
तैसे तूझे स्मरति गुण जे इष्टमित्रां अझूनी
देती अंतःकरणिं कुतुका, आणिती नेत्रिं पाणी ! ॥ ६० ॥

श्रेष्ठध्येया सुहृदयमनोवेधि ज्या ज्या गुणांनीं
आर्यस्त्रीच्या सुविमल यशा गाइलें सत्कवींनीं,
त्यांचा नाहीं कलियुगिंहि या लोप झाला अझूनी,
ऐसें साध्वी तुजसम जगा दाविती सत्कृतींनीं ! ॥ ६१ ॥

---

१ पवित्र आत्म्याला. २ हेतुविरहित. ३ सुवासानें.

धर्मीं श्रद्धा, प्रभुपदिं रती, भक्ति शुद्धात्मतेची,
शुद्धाचारीं मति दृढतमा, सत्यनिष्ठा मनींची,
यांशीं[1] तूझ्यासम सुहृदया साधिती लोभनीया
पातिव्रत्यासह निजजनप्रीतिची जोड धन्या ! ॥ ६२ ॥

धीरोदारा मति तव, सुधास्यंदि, शांत स्वभाव,
द्वेषा जेथें अपकृतिंतही नाहिं गर्वाहि ठाव;
भावार्थाची सुविहित[2] तुझी सर्वदा धी भुकेली,
कर्तव्याला सुखिंहि विमुखा स्वल्पतुष्टा न झाली ॥ ६३ ॥

त्वद्वृत्तीच्या सम मृदुलता, नम्रता वाक्कृतीची,
दृष्टी येते विरळ जगिं,—ही त्वत्स्तुती मद्गुरूची;[3]
क्रोधा केलें नच मजवरी एकदांही प्रमादीं;
केलें नाहीं परुष वचना रागिं, लोभीं, विनोदीं ॥ ६४ ॥

कर्तव्यीं धी निरत, हृदयीं प्रीति ही सात्विकाची;
आसक्ती ही जनहितपरा मानसीं सत्कृतीची;
—धीनें तूझ्या ग्रहणचतुरें साधिलें या गुणांतें;
तेणें सुज्ञा सचिव मम तूं देशि सुप्रेरणांतें. ॥ ६५ ॥

ध्यानीं आणूं, स्तवुं किति तुझ्या आठवूं सद्गुणांतें ?
झाली हानी,—न मिति, तुलना नाहिं तत्तीव्रतेतें;
दुःखें ऐशा द्रव परि कधीं मृत्युला नाहिं आला !
त्यानें केला परत न बळी एकदां घेतलेला ॥ ६६ ॥

---

१ वरील गुणांशीं पतिप्रेमाची वगैरे सुंदर जोड तुझ्यासारख्या साध्वी साधतात. २ सुव्यवस्थित धी-बुद्धि. ३ माझ्या गुरुवरांनीं तुझी अशी स्तुति केली.

नं. ९९८
ता. ........

[ ९ ]

इच्छा नाहीं परि मज मुळीं [illegible] मृत्यूस याया;
कर्तव्यें तन्नियत असतीं, लागतीं त्या कराया;
मातें कार्या व्यवहृति[1] परी ईश्वराशींच खास;
मुख्य न्यायाधिप भुवनिंचा,—प्रश्नही एक त्यासः ॥ ६७ ॥

भीतार्तांचा सकरुण सुहृत्,[2] नीतिचा तूं नियंता,
न्यायाचा तूं उगम असशी, संकटांचा विजेता,
सद्भावाचा प्रियतम सखा, शासिता दुर्जनांचाः—
गाती ऐसा बुधजन तुझा धन्यवाद स्तुतीचा. ॥ ६८ ॥

कर्ता, भर्ता, असासि सजला[3] शक्तिनीं तूं अनंतीं;
संबोधीती विबुध तुजला सच्चिदानंदमूर्ती;
ऐसा **एक-प्रभु** असुनि तूं, कां दिसावी जगांत
न्यायापेक्षां प्रबलतमता क्रूरतेची अनंत ? ॥ ६९ ॥

ठावें मातें, कथिति बुध कीं, जन्मजन्मांतरींचीं
कर्में केलीं असतिल, फळें येति त्या त्या परीचीं;
हा कर्माचा नियमच परी न्यायनीतीस तोडी;
सौख्यादुःखाविषयिं न शके सोडवायाहि कोडीं. ॥ ७० ॥

एका जन्मीं करि मनुज तीं अन्यजन्मीं फळाला
येती कर्में; स्मृति न उरतां होइ शिक्षा नराला !
पूर्वी केली सुकृति म्हणुनी काय पाप्यां मिळावीं
सौख्यें, पापाचरणिंहि यशःश्री जगीं प्राप्त व्हावी ? ॥ ७१ ॥

---

१ न्यायमंदिरांतील व्यवहार, कोर्टांतील खटला. २ मित्र. ३ अलंकारिलेला.

या जन्मींचे कितिक गुणवान्, पुण्यवान् साधु संत
होती आपच्छर्ति हत, सदा गांजिलेले जगांत ?
त्यांच्या हस्तें कधिंहि घडलें पाप वाटे न मातें;
होती पात्र प्रभु ! अनियता[१] कां न ते त्वत्कृपेतें ? ॥७२॥

इच्छा नाहीं, बल न मज हीं सोडवायास कोडीं;
अल्पा माझी मति शिणविणें व्यर्थ अज्ञेयिं गूढीं;
कां कोपूनी परि वद विभो ! आग ही सांडलीस ?
घाला दैवा मजवरि असा घोर घालूं दिलास ? ॥ ७३ ॥

या जन्मीं मीं प्रभुवर ! कधीं न्यायनीतीविरुद्ध
केलेला न स्मरत मजला अक्षमार्ह[२] प्रमाद;
अल्पांशत्वें तरि परहित-ध्येयिं धी ठेवियेली;
सत्या—सत्वा-वरिल शिथिल प्रीति केव्हां न केली. ॥ ७४ ॥

एका भावें सुखि असुखिंही भक्ति केली पदांची;
श्रद्धा नाहीं ढळलि कधिंही त्वत्पदींची मनींची;
हें सारेंही विफल भगवन् ! केविं तूं मानियेलें ?
शिक्षा केली मजसि गहनीं कां तमीं लोटियेलें ? ॥ ७५ ॥

या लोकींचे नृप अवसरा[३] बंदिवानांहि देती
भेटायातें समयिं सुहृदां, अंतरीं आर्द्र होती;
कर्मन्यायासन[४] परि तुझें ओळखीना दयेला !
नाहीं कोणा स्थळ लव तिथें ठेविलें कीं क्षमेला ? ॥ ७६ ॥

---

१ अनंत, अनिर्बद्ध. २ क्षमा न करितां येण्यासारखा अपराध. ३ वेळ. ४ कर्माप्रमाणें फळ मिळालें पाहिजे ह्या कायद्याची अंमलबजावणी जेथून करावयाची ती मुख्य न्यायाधीशाची गादी.

होती पत्नी परि मम किती जाणसी पुण्यशील;
माझेपेक्षां शतगुण तिचा हक्क तूझेवरील;
संसाराला सरस चढला रंग, अभ्यंग आला
सौख्याचा जों परिणत[1] ऋतू, तोंच नेलें तियेला ! ॥ ७७ ॥

सत्कृत्यें तन्मनिंचि सगळीं जागचीं जागिं ठेलीं;
होती अंतःकरणिं विविधा हौस तीही निमाली;
झाले दुःखी प्रियजन,—तयें थोरही दुःख तीतें:—
होती पात्र प्रभुवर ! कशी ती अशा क्रूरतेतें ? ॥ ७८ ॥

[ ६ ]

आहे सारा भ्रमच मम कीं सर्व हा स्वार्थमूल ?
दुःखानें कीं मतिस पडली क्षम्य, अक्षम्य भूल ?
आहे व्यर्थ प्रभुशि सगळा वाद हा; त्या असेल
साधायाचें निधनिं सखिच्या श्रेय कांहीं अमोल ! ॥ ७९ ॥

× × ×

नेमी दोघांमधिल अपुल्या दैव कीं एक जावा
मृत्यूचीये मुखिं कुणि बळी याच वेळीं पडावा ?
पुण्याचारा, मृदुल हृदया, तूं गुणांनीं सुवासा,[2]
पाहोनी ने विधि तुजसि, दे अक्षयींच्या सुवासा[3]! ॥८०॥

होतीं येणें प्रियजनिं महा संकटें कीं कुठूनी,
येतां पुण्यें कळुनि, हरिशी आत्मयज्ञा करूनी ?
किंवा कांहीं निजकुलमहच्छ्रेयकारी कृतीसी
योजूनी तूं प्रभुपदिं यशा जासि मागावयासी ? ॥ ८१ ॥

---

१ परिपक्व. २ सुशोभित. ३ चांगली वसति.

या लोकींचें बहुत दिन कीं राहणें इष्ट नाहीं;
आत्मज्ञाना विसरुनि रमे खास आत्माच मोहीं;
संसारीं तूं अधिक विवशा वाढत्या प्रेमपाशीं
होसी बद्धः—प्रभु बघुनि कीं ने निजा सन्निधीसी? ॥८२॥

जेथें सारें स्थिर, नच रजस्तामसा स्थान जेथें,
सौंदर्या न क्षय, न विदिता म्लानता माधुरीतें,
झाली ऐशा स्थळिं कवण कीं साधुतेची रिकामी
गादी?—तेथें प्रभु करि तुझी योजना पुण्यकामीं? ॥८३॥

जेथें जैशी सुकृतिसदृशा[1] सद्गती, योग्य मानें
द्याया नेलें तुजसि करुणासागरानें प्रभूनें,
त्याचें थोडें कळुनि जरि ये निश्चयें वृत्त मातें,
त्वत्प्राप्तीच्या करिन सगळा जन्म एकव्रतातें! ॥ ८४ ॥

× × ×

तीची प्राप्ती? विफलच पुरे शब्द या जन्मिं आतां;
होतें वेडेपणच मनिं ही कल्पना येउं देतां:
आहे आतां मज धनिपणा दुःखशोकाश्रु यांचा,
मूर्ती अश्रूंमधुनि दिसते तेवढी पाहण्याचा! ॥ ८५ ॥

× × ×

त्वन्मुर्तीतें हृदयिं धरुनी, नाम तूझें स्मरूनी,
मी कंठीन प्रियसखि! दिनां हौस आशा त्यजूनी;
सद्भाग्याची गणिन तुज कीं भार जो संसृतीचा
पीडी मातें, तुज न उरला जाच कांहीं तयाचा! ॥८६॥

भोगी सौख्यां प्रियसखि! परा—लोकिंच्या तूं सुखानें!
साधीं आत्मोन्नतिहि अधिका पुण्यतेच्या बळानें!

---

१ सत्कृत्यानुरूप.

सायुज्यें[1] जों परि नच परब्रह्मिं होशी विलुप्त,
तावन् माझे विनतिस सखे ! मान दे आर्द्रचित्त ! ॥ ८७ ॥

दुःखग्रस्त प्रियजन तुझे राहिले या जगांत,
त्यांचे ठायीं अचल, अमर प्रेम ठेवीं मनांत !
संसाराच्या गहन विपिनीं दावि सन्मार्ग त्यांला !
साधीं, दूरी दुरित[2] करुनी, रक्षयित्री[3] ! शुभाला. ॥ ८८ ॥

थोडा माझा अधिक सखये ! हक्क तूझेवरील;
वाटे, त्यातें स्मरुनि फलही थोडकें अर्पिशील !
विज्ञप्ती कीं, मम तुजवरी जी पुरा प्रीति होती,
होवो तीची विरहिं अधिका जागृता ज्योति चित्तीं ! ॥८९॥

माझी दूजी विनति तुज कीं, लाभली जी नवीन
गादी, तीच्या विभव[4]—गुरुशा कारभारा करून,
आरामाचे समयिं, सखये ! पूर्व वृत्त स्मरूनी,
ये भेटीला ! कळुंहि[5] मज दे भेटलीसी म्हणूनी ! ॥ ९० ॥

प्रत्यक्षत्वें तव जरि सखे ! भेट होणेंच नाहीं,
भेटीचा तूं समयिं मजला होउं दे भास कांहीं !
मायाऽभासें म्हणति सगळें विश्व गेलें भरून;
भासें होई सुख, मजसि तो लक्षरत्नांसमान ! ॥ ९१ ॥

---

१ सायुज्यमुक्तीनें म्हणजे आपला आत्मा परमात्म्यांत मिळून जाऊन. २ संकट. ३ रक्षण करणारे देवते ! ४ वैभवानुरूप महत्त्वाच्या. ५ मृत प्रियकराचा आत्मा आपल्या भेटीस येतो, पण तो तसा आल्याची आपल्यास जाणीव होत नाहीं, ती तुजसंबंधें मला व्हावी, असा आशय आहे.

विश्वासें कीं सकल करिशी मान्य माझ्या विनंती,
"माले"ची या मजसि करुंदे "अश्रुं"च्या तूं समाप्ती;
वंदो, निंदो, बुधजन गणो पात्र हीतें स्तुतीस;
माझेऐशा विधुरनयनीं अश्रु आणील खास ! ॥ ९२ ॥

## [ ७ ]

### दिंडी.

आर्यभूची[1] गीर्वाण मधुर वाणी
सुरस वाङ्मयिं ज्या मंडिली बुधांनीं,
त्यांत कविवरजयदेवसम न कोणी
सुरस ललितस्वर रचिलिं मधुर गाणीं. ॥ ९३ ॥

---

१ पुढील कवितांत उल्लेख केलेली कथा येणंप्रमाणें आहे. "गीत गोविंद" या प्रसिद्ध संस्कृत वीणाकाव्याचा कर्ता जयदेव कवि हा मोठा श्रीकृष्णभक्त म्हणून प्रसिद्ध होता. तो वंग देशाच्या लक्ष्मणसेन नामक राजाचा मित्र व आश्रित असे. त्याची धर्मपत्नी पद्मावती ही महापतिव्रता होती. ती एके दिवशीं राजवाड्यांत राणीच्या भेटीला गेली असतां, खालून रस्त्यांतून एक शोकजनक प्रेतयात्रा, पुढें एका तरुणाचें प्रेत व मागें मृतपतीबरोबर सती जाण्यास तयार झालेली त्याची स्त्री, अशी गेली. तो तरुण राजाचा भाऊच होता, असें कित्येक म्हणतात. राणी व तिच्या सख्या यांनीं त्या सतीचे धन्यवाद गाइले. पद्मावती कांहीं बोलली नाहीं व त्यांच्या धन्यवादांत सामील झाली नाहीं. तिला याचें कारण विचारतां तिनें सांगितलें कीं, माझ्यामतें पतीबरोबर चितेंत प्रवेश करणें म्हणजे कृत्रिम आत्मघात होय, खरें पातिव्रत्य नव्हे. पतिमृत्यु होतांच किंवा त्याची वार्ता ऐकतांच देह ठेवील तीच खरी पतिव्रता.' हे बोलणें राणीनें लक्षांत ठेवून पद्मावतीची परीक्षा पाहण्याचा निश्चय केला. एके दिवशीं राजा व जयदेव शिकारीस गेलें असतां तिनें पद्मावतीला खोटी बातमी सांगितली की, रानांत जयदेव व्याघ्रमुखीं पडून मृत्यु लावला. "सत्य सत्य ?" असें

वधू दुर्लभ गुणरूपयुता त्याची,
नाम पद्मा भुवनैकसती साची;
म्हणे, साध्वी पतिरता खरी तीला
साह्य अनुगमना[1] अग्निचें कशाला? ॥ ९४ ॥

तिजसि कथिती, परिहासिं,[2] परीक्षार्थ,
वनीं झाला पतिमृत्यु अकस्मात!
" सत्य, सत्यच " इति पुसुनियां त्रिवाचें,
देह ठेवी क्षणिं, वचन करी साचें ! ॥ ९५ ॥

अशा दैवाच्या घोर दुर्विपाकीं[3]
गळति कविच्या क्षण चित्तवृत्ति दुःखीं;
करी आक्रोश क्षणीं सुटुनि धीर,
अश्रुपूरांवरि नयनिं येति पूर! ॥ ९६ ॥

वीज पडतां धरणिनें दुभंगावें,
प्रबळ निर्झर उसळूनि वरी यावे,
तसें भंगुनि कविहृदय, अंतरींचे
पूर येती बाहेर कवित्वाचे. ॥ ९७ ॥

---

तीनदां विचारतां " सत्य सत्य " असें उत्तर मिळाल्याबरोबर पद्मावतीनें देह ठेविला! अर्थात सर्वत्र हाहाकार झाला. पुढें राजा व जयदेव परत आले. व सर्वांनीं अत्यंत शोक केला. पण शोक आवरून कवि जयदेवानें "गीतगोविंद" काव्यानें परमेश्वरास आळविलें, व ईश्वर प्रसन्न होऊन पद्मावती पुनश्च उठली, अशी कथा आहे. काव्यगायनानें मृत मनुष्य पुनश्च सजीव होणें शक्य असेल तर " गीतगोविंद " काव्याची तशीच योग्यता आहे खास.

१ पतीचे पाठीमागून परलोकीं जाण्याला. २ थट्टेंत. ३ दुष्परिणामीं.

करुणरसिं मग उत्क्रांत भक्ति झाली,
पुण्य सरिता[1] नव गीतिची उदेली,
कृष्ण-राधा-सप्रेम-सुधावाही
तापहारी गंगाच जगीं दुजी ही ! ॥ ९८ ॥

गीतिसरितापुण्यौघ[2] सबळ चाले,
मधुर घोषें त्या भुवन नादवीलें;
काल, दिङ्, नभ भेदूनि सूर जाती,
जागवीती प्रभुतेंच मोहवीती. ॥ ९९ ॥

लुब्ध कवनें, गायनें सुप्रसन्न,
भक्तिवश तो करि भक्तहेतु पूर्ण;
उठवि पद्मा, वधु परत पतिसि देई;
"धन्य पद्माजयदेव !" भुवन गाई. ॥ १०० ॥

"गीतगोविंदा" परिस मधुर गीतें
रचुनि गाया प्रतिभा न असे मातें;
प्रभो ! परि शुचि-सद्भाव-सबलतेंत
न्यून दृष्टिस वद तूंच किती येत ! ॥ १०१ ॥

मत्सखी तरि मंडिली गुणिं अनंत
होति, जाणसि तूं, शुद्ध, मधुर, शांत;
कवनगानव्रतिं लाभ तरी मातें,
प्रभो ! होऊं दे अल्प ! करि कृपेतें ! ॥ १०२ ॥

नको भीती धरुं, भार शिरीं थोर,
तुझ्या द्यावासा नाहिं मनिं विचार;

---

१ नदी. २ गीतिरूप नदी, तिचा पवित्र ओघ.

गेलि सौभाग्यीं इथुनि मिळुनि मुक्ती,
परत यावी सखि, ही न मम विनंती! ॥ १०३ ॥

नवाधिष्ठित[1], परि हृदयिं शांतिदा ती
सखीची जी सानंदवदन मूर्ती
सतत राहो उज्वळा तिची ज्योती!
—नम्रतर हा मज एक हेतु चित्तीं ॥ १०४ ॥

ह्याच हेतूच्या स्फूर्तिच्या बळानें
आर्द्र नयनीं, सोत्कंठ मानसानें,
रचिलि कविता ही '**दुःखिताश्रुमाला**'-
भेट शेवटची अर्पिली सखीला! ॥ १०५ ॥

अल्प अंशें ऋण तिच्या उपकृतीचें
फेडण्याचें, गुण तिचे अर्चिण्याचें,
एक साधन हें करिन, तयाहून
अन्य नाहीं प्रिय, नाहिं समाधान! ॥ १०६ ॥

दिव्य[2] म्हणुनी जयदेवकविवराचें
काव्यगानव्रतिं दैवतार्चनाचें
इष्ट हेतू साधण्या अनुकरीन,
प्रियाराधन मी काव्यिं या करीन. ॥ १०७ ॥

तिची घेउनि तसबीर पुढें साची,
हृदयिं करुनी सगुणाहि मूर्ति तीची,

१ नव्यानें स्थापिलेली. २ प्रबळ दैवी उपाय.

गात राहिन हें फिरुनि फिरुनि गान;
अमित पारायणिं सखिस आळवीन ! ॥ १०८ ॥

कधीं तरि ती, वाटतें, प्रभुकृपेनें
सुप्रसन्ना होऊनि, गुणबळानें
मजसि देइल दर्शना मूर्तिमंत !
सर्व होतिल मग तृषा क्षुधा शांत ! ॥ १०९ ॥

तया भेटीच्या ब्रह्मसुखानंदीं
लीन होतिल तल्लीन सर्व बुद्धि !
वृत्ति होउनि सुप्रेमरसीं लुप्त
तन्मयत्वा उरणार नाहिं अंत ! ॥ ११० ॥

जीवकारण-परिपूर्ति-भाव-जाता[१]
शांति अनुपम मानसीं अनुभवीतां
तंद्रि लागुनि मग शेवटील झोप
खचित घेइन होऊनि सखि अमप !!! ॥ १११ ॥

REFBK-0001689
REFBK-0001689
१६८८
६६८

समाप्त.

१ जीवित हेतु परिपूर्ण झाला या भावनेपासून उत्पन्न झालेली.